10 MAY 2022

तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# ‘स्वच्छ ऊर्जानिर्मिती’त डॉ. काकडेंचे योगदान

## प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांचे प्रतिपादन ‘: डॉ. भालचंद्र काकडे स्मृती व्याख्यानमाला

प्रतिनिधी
कोल्हापूर

पर्यावरणपूरक व स्वच्छ ऊर्जानिमिर्तीसाठी स्वदेशी तंत्रज्ञानाच्या विकासामध्ये डॉ. भालचंद्र काकडे यांनी मोलाचे योगदान दिले आहे. त्यांच्या निधनामुळे संशोधन क्षेत्रात मोठी पोकळी निर्माण झाली, असे प्रतिपादन प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांनी केले.

‘डॉ. भालचंद्र काकडे स्मृती व्याख्यानमाले’च्या उद्घाटनप्रसंगी ऑनलाईन व्याख्यानात ते प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी ऑनलाईन शुभेच्छा संदेश दिला.

प्र-कुलगुरू डॉ. पाटील म्हणाले, शाश्वत ऊर्जेच्या विकासाच्या दिशेने संशोधनाची दिशा केंद्रित केली होती. जैविक इंधनाच्या अतिरेकी वापरामुळे निसर्गामध्ये मोठ्या प्रमाणात कार्बनचे उत्सर्जन होते. डॉ. काकडे यांनी केवळ सौर



आणि पवन ऊर्जाच नव्हे, तर त्यापुढे जाऊन पर्यावरणपूरक व स्वच्छ ऊर्जा निर्मितीसाठी नवीन स्वदेशी तंत्रज्ञान विकास करण्याचा चंग बांधला होता. त्यांनी चेन्नईच्या एस. आर. एम. विद्यापीठात अल्पावधीत अत्याधुनिक प्रयोगशाळा विकसित केली होती. फ्युएल सेल, सुपरकॅपॅसिटर, कार्बन नॅनोट्यूब्ज, ग्राफिन, मेटल नॅनो पार्टिकल कम्पोझिट्स निर्मिती अशा विविधांगांनी त्यांनी तेथे प्रयोग केले. त्रिमितीय नॅनो मटेरियलच्या माध्यमातून पृष्ठीय क्षेत्रफळ अत्यधिक मूलद्रव्यांच्या निर्मितीसाठी ते प्रयत्नशील होते, ज्याद्वारे अधिकाधिक उत्तम क्षमतेचे फ्युएल सेल निर्माण करणे शक्य होणार होते. यामध्ये केवळ पाण्यापासून स्वच्छ हायड्रोजन ऊर्जा मिळवून त्याआधारे वीजनिर्मिती करण्याचे ध्येय त्यांनी बाळगलेले होते. या ऊर्जेच्या सहाय्याने रेल्वे सुद्धा आपण चालवू शकतो, असा दुर्दम्य विश्वास त्यांच्यात होता आणि त्या दिशेने त्यांचे संशोधन सुरू होते. डॉ. काकडे यांनी राष्ट्रीय रासायनिक प्रयोगशाळा, आयआयटी, मुंबई आणि चेन्नई येथील उत्तम तंत्रज्ञ, शास्त्रज्ञांना एकाच मंचावर आणून स्वच्छ ऊर्जा निर्मितीसाठी भारतीय तंत्रज्ञान विकसित करण्याची जबाबदारी उचलली होती. त्यासाठी आवश्यक असणारी बौद्धिक प्रगल्भता आणि आर्जव यांचा अतिशय अनोखा संगम डॉ. काकडे यांच्या व्यक्तिमत्त्वात आढळतो, असे त्यांनी सांगितले.

तरुण भारत

# कमला महाविद्यालयात कार्यशाळा

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या श्रीमती शारदाबाई गोविंदराव पवार अध्यासन केंद्र आणि महीका मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने कमला महाविद्यालयात पदवीधर महिलांसाठी 'रोजगाराच्या संधी आणि क्षमतेची बांधणी' यावर एक दिवसीय कार्यशाळा संपन्न झाली. कार्यशाळेचे उद्घाटन प्राचार्या डॉ. तेजस्विनी मुडेकर यांच्या हस्ते झाले.

महीकाचे संस्थापक हिरेन कुलकर्णी आणि सहसंस्थापक अनुपमा रामटेके यांनी विद्यार्थिनींना मार्गदर्शन केले. प्राचार्या डॉ. तेजस्विनी मुडेकर, शारदाबाई पवार अध्यासन केंद्राच्या समन्वयक डॉ. भारती पाटील, शिवाजी विद्यापीठ सेंट्रल प्लेसमेंट समन्वयक डॉ. गजानन राशिनकर यांचे सहकार्य लाभले. ताराराणी विद्यापीठाचे कार्यकारी अध्यक्ष डॉ. क्रांतीकुमार पाटील यांच्या मार्गदर्शनाने कार्यक्रम झाला. प्रास्ताविक व आयोजन प्रा. डॉ. वर्षा मैंदर्गी यांनी केले. सचिन देठे, प्राची खाडे, शिवानी कागले आणि पूजा दुधगावकर उपस्थित होते.

10 MAY 2022 तरूण भारत
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# 'ॲग्रोकेमिकल्स'च्या संशोधनाला सुविधांमुळे गती

## मंत्री उदय सामंत : ॲग्रोकेमिकल्स अँड पेस्ट मॅनेजमेंट विभागाच्या इमारतीचे उद्घाटन

**प्रतिनिधी**
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठाने संशोधनाच्या क्षेत्रात स्वतःचा लौकिक निर्माण केला आहे. ॲग्रोकेमिकल्स अँड पेस्ट मॅनेजमेंट अभ्यासक्रमही त्याला अपवाद नाही. आता स्वतंत्र इमारतीमुळे व सुविधांमुळे विभागातील अध्यापनाबरोबरच संशोधनाला गती येईल, असा विश्वास उच्च व तंत्रशिक्षण मंत्री उदय सामंत यांनी व्यक्त केला.

शिवाजी विद्यापीठाच्या ॲग्रोकेमिकल्स अँड पेस्ट मॅनेजमेंट विभागाच्या नूतन इमारतीचे उद्घाटन मंत्री उदय सामंत यांच्या हस्ते सोमवारी झाले. यावेळी ते प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांची प्रमुख उपस्थिती होती.



**कोल्हापूर : एजीपीएम विभागाच्या नूतन इमारतीचे उद्घाटन करताना मंत्री उदय सामंत. सोबत डॉ. पी. एस. पाटील, डॉ. व्ही. एन. शिंदे, डॉ. एस. एस. चव्हाण, कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, डॉ. नागराजा आदी.**

मंत्री सामंत यांनी विद्यापीठात विविध कामकाजाचा आढावा घेतला. ॲग्रोकेमिकल्स अँड पेस्ट मॅनेजमेंट अभ्यासक्रमाच्या नूतन इमारतीचे कोनशिला अनावरण केले. मंत्री सामंत यांनी प्रयोगशाळेतील उपकरणांची व विभागातील संशोधनाची माहिती घेतली. विभागप्रमुख डॉ. एस. एस. चव्हाण यांनी विभागाच्या वाटचालीचा अहवाल सादर केला. यावेळी प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, अभियांत्रिकी विभागाचे प्रभारी उपकुलसचिव आर. पी. यादव, डॉ. नागराजा, डॉ. के. डी. सोनावणे, डॉ. ए. डी. जाधव, डॉ. चैताली बगाडे, डॉ. किशोर खोत आदी उपस्थित होते.

लोकमत

# शिवाजी विद्यापीठात भाऊराव पाटील यांना अभिवादन

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या स्मृतिदिनानिमित्त त्यांच्या पवित्र स्मृतींना सोमवारी अभिवादन करण्यात आले.

शिवाजी विद्यापीठाच्या मानव्यविद्या विभागाच्या इमारतीसमोरील कर्मवीर पाटील यांच्या पुतळ्यास कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के त्याचबरोबर प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांच्या हस्ते पुष्प वाहून अभिवादन करण्यात आले. मुख्य प्रशासकीय भवनमध्येही कुलगुरू, प्र-कुलगुरू यांच्या हस्ते कर्मवीरांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आला.

या कार्यक्रमाला प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. आर. के. कामत, विद्यार्थी विकास मंडळाचे संचालक डॉ. आर. व्ही. गुरव, भूगोल अधिविभागाचे प्रमुख डॉ. संभाजी शिंदे, सचिन पन्हाळकर, आदी यावेळी उपस्थित होते.

10 MAY 2022
लोकसत्ता
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# कर्मवीर भाऊराव पाटील विद्यापीठ जूनपासून सुरू - शरद पवार

वार्ताहर कराड

**कराड :** रयत शिक्षण संस्थेतर्फे कर्मवीर भाऊराव पाटील विद्यापीठ सुरू करण्यास राज्य शासनाने परवानगी दिल्याने येत्या जूनपासून हे विद्यापीठ उभे राहिलेले असेल, असा विश्वास देताना कर्मवीरांनी पाहिलेली सर्व स्वप्ने सत्यात उतरत असल्याचे सांगत याबाबत 'रयत'चे अध्यक्ष, खासदार शरद पवार यांनी समाधान व्यक्त केले.

रयत शिक्षण संस्थेचे संस्थापक कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या ६३ व्या पुण्यतिथिनिमित्त सातारा येथे कर्मवीर समाधीस्थळी आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. उपमुख्यमंत्री अजित पवार, पालकमंत्री बाळासाहेब पाटील, कृषी राज्यमंत्री विश्वजित कदम, खासदार श्रीनिवास पाटील, सुप्रिया सुळे, रामशेठ ठाकूर आदींची प्रमुख उपस्थिती होती. या वेळी रयत शिक्षण संस्थेकडून देण्यात येणाऱ्या पुरस्कारांनी बीजमाता राहीबाई पोपेरे, राज्याचे गृहमंत्री दिलीप वळसे-पाटील, रतनबाई गणपतराव देशमुख आदींचा सन्मान करण्यात आला.



सातारा येथे कर्मवीर समाधीस्थळी श्रद्धांजली वाहताना, शरद पवार समवेत डॉ. अनिल पाटील, दिलीप वळसे-पाटील, अजित पवार व अन्य.

शरद पवार म्हणाले, की कर्मवीरांनी शिक्षण कार्यासाठी आपले अवघे आयुष्य वेचले. आज त्यांनी स्थापन केलेल्या रयत शिक्षण संस्थेचा खऱ्या अर्थाने वटवृक्ष झाला आहे. तर, संस्थाचालकांनी या वटवृक्षाला सेंद्रिय खतपाणी घालण्याची जबाबदारी पेलल्याने त्याची फळे सर्वसामान्य वर्गातील मुलांना चाखायला मिळत आहेत. 'रयत'च्या या वटवृक्षाची निरोगी वाढ होत असल्याने त्यातून गुणवंत पिढी घडून राष्ट्राच्या प्रगतीला हातभार लागत असल्याचा विश्वास पवार यांनी दिला. रयत परिवारातील ज्येष्ठ सदस्य प्रा. डॉ. एन. डी. पाटील, भाई गणपतराव देशमुख, डॉ. शंकरराव कोल्हे हे आज आपल्यात नसल्याची खंत व्यक्त करताना त्यांच्या आठवणींना शरद पवारांनी उजाळा दिला. पुरस्कार प्राप्त मान्यवरांच्या कार्याचा थोडक्यात आढावा घेताना त्यांचे अभिनंदनही त्यांनी केले.

'रयत'चे कार्याध्यक्ष डॉ. अनिल पाटील यांनी संस्थेच्या कार्याचा आढावा मांडला. प्रास्ताविक संस्थेचे सचिव डॉ. विठ्ठल शिवणकर यांनी केले.

पुढारी

# कर्मवीर भाऊराव पाटील यांना शिवाजी विद्यापीठात अभिवादन

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठात कर्मवीर भाऊराव पाटील यांना स्मृतिदिनानिमित्त अभिवादन करण्यात आले. विद्यापीठातील मानव्यविद्या इमारतीसमोरील कर्मवीर पाटील यांच्या पुतळ्यास कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांच्या हस्ते पुष्प वाहून अभिवादन करण्यात आले. त्यानंतर मुख्य प्रशासकीय भवनातही कुलगुरू, प्र-कुलगुरू यांच्या हस्ते कर्मवीर पाटील यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आला. प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. आर. के. कामत, विद्यार्थी विकास मंडळाचे संचालक डॉ. आर. व्ही. गुरव, भूगोल अधिविभाग प्रमुख डॉ. संभाजी शिंदे, डॉ. सचिन पन्हाळकर उपस्थित होते.

पुढारी

# व्यक्तिमत्त्व विकासासाठी जीवन कौशल्य अंगिकारा : डॉ. मालू

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**



प्रत्येक व्यक्तीला जीवनात यशस्वी होण्यासाठी व्यक्तिमत्त्व विकासाबरोबर जीवन कौशल्य अंगिकारणे गरजेचे आहे, असे प्रतिपादन रुबिकॉन संस्थेच्या प्रशिक्षक डॉ. सीमा मालू यांनी केले.

शिवाजी विद्यापीठात एम. बी. ए. विभागातर्फे पाच दिवसीय जीवन कौशल्य कार्यक्रमाच्या उद्घाटन प्रसंगी त्या बोलत होत्या. अध्यक्षस्थानी वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखेचे अधिष्ठाता प्रा. डॉ. श्रीकृष्ण महाजन होते.

सूरज नदाफ प्रमुख म्हणून उपस्थित होते. डॉ. सीमा मालू म्हणाल्या, व्यक्तिमत्त्व विकासासाठी व्यक्तीचे सामर्थ्य, सौंदर्य व संपन्नता, आत्मविश्वास, कार्यक्षमता, स्मरणशक्ती, संभाषण, नेतृत्व, वेळेचे नियोजन, सकारात्मक दृष्टीकोन, ध्येयनिष्ठा, प्रयत्नांची पराकाष्ठा इत्यादी प्रकारे व्यक्तिमत्त्व विकास साधता येतो. प्रा. महाजन अध्यक्षीय भाषणात म्हणाले, विद्यार्थांनी ज्ञान व कौशल्य विकसित करण्यासाठी सकारात्मक दृष्टिकोन जोपासणे गरजेचे आहे.

काळाच्या प्रवाहात यशप्राप्तीसाठी प्रत्येक विद्यार्थ्याला स्वतःला सिद्ध करण्यासाठी व्यक्तिमत्तृव विकास साधणे अनिवार्य बनले आहे. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्रावणी माळी यांनी तर प्रास्ताविक डॉ. दीपा इंगवले यांनी केले. यावेळी डॉ. अनुप मुळे, डॉ. गंधाली खारगे व डॉ. रामदास बोलके उपस्थित होते. मीनल शिंदे यांनी आभार मानले.

पुढारी



कोल्हापूर : स्टार्टअप व इनोव्हेशनमधील उत्कृष्ट इनोव्हेशनची संकल्पना मांडलेल्या उद्योजकांना जिल्हाधिकारी राहुल रेखावार यांच्याहस्ते पुरस्कार देऊन गौरविण्यात आले.

# स्टार्टअप इनोव्हेशन उपक्रमात खाडे, कुंभोजकर यांची निवड

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या शंभराव्या स्मृतिदिनानिमित्त आयोजित स्टार्टअप व इनोव्हेशन फेस्टिव्हल-२०२२ उपक्रमात विश्वजित खाडे, नितीन कुंभोजकर व धवल चौगुले व महिलांमध्ये सागरिका पटवर्धन यांच्या इनोव्हेशनची निवड करण्यात आली.

या उपक्रमात ३२५ नावीन्यपूर्ण संकल्पनांची नोंद झाली होती. त्यापैकी १०९ नावीन्यपूर्ण संकल्पनांची निवड त्यांच्या गुणवत्तेनुसार करण्यात आली. जिल्हाधिकारी कार्यालय, महाराष्ट्र स्टेट इनोव्हेशन सोसायटी, शिवाजी विद्यापीठ आणि सिबिक बिझनेस इन्क्युबेटर यांच्या सहभागातून फेस्टिव्हल पार पडले. विजेत्या स्पर्धकांची निवड महाराष्ट्र स्टेट इनोव्हेशन सोसायटी या संस्थेच्या तज्ज्ञ प्रतिनिधींकडून करण्यात आली. विजेत्या विश्वजित खाडे यांना प्रथम क्रमांकाचे प्रमाणपत्र व रोख रक्कम १ लाख, नितीन कुंभोजकर यांना द्वितीय क्रमांकाचे प्रमाणपत्र व रोख रक्कम रुपये ७५ हजार व धवल चौगुले यांना तृतीय क्रमांकाचे प्रमाणपत्र व रोख रक्कम ५० हजार रुपये जिल्हाधिकारी राहुल रेखावार यांच्या हस्ते बक्षीस देण्यात गौरविण्यात आले.

यावेळी पालकमंत्री सतेज पाटील म्हणाले, हे फेस्टिव्हल नव्या उद्योजकांना प्रोत्साहन व बळ देणारे आहे. आजच्या आधुनिक युगात अशा पद्धतीचे उपक्रम राबवून स्टार्टअप व इनोव्हेशन फेस्टिव्हलच्या माध्यमातून राज्य पातळीवरील मोठे कार्य घडले आहे. या समारंभास शिवाजी विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, चंद्रशेखर डोली, पेंडसे, एम. वाय. पाटील आदी मान्यवर उपस्थित होते.

पुढारी

# शाहू मिलमधील विविध प्रदर्शनास उदंड प्रतिसाद

## ग्रंथ विक्रीतून ५ लाख, तर कापडे विक्रीतून दोन दिवसांत २० लाखांची उलाढाल

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

छत्रपती शाहू महाराज स्मृती शताब्दी कृतज्ञता पर्वानिमित्त शाहू मिलमध्ये विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. यामध्ये छायाचित्र प्रदर्शन, ग्रंथ प्रदर्शन, कापड जत्रा यासह विविध प्रदर्शन भरविण्यात आली होती. त्यास उदंड प्रतिसाद मिळाला. कापड जत्रा मंगळवारीही सुरू राहणार आहे.

छायाचित्र प्रदर्शनामध्ये राजर्षी शाहू महाराजांच्या जीवनातील राजकीय, सामाजिक क्षेत्रातील विविध प्रसंगांची छायाचित्रे, कौटुंबिक प्रसंग, परदेश दौरा तसेच शाहूकालीन छायाचित्रे यासह २८ वर्षांच्या कालखंडात शाहू राजांनी वेळोवेळी जनहितार्थ केलेल्या सुमारे १ लाख आदेशातील निवडक आदेश, कायदे, कागदपत्रे,पत्र्यव्यवहार शाहू व इतिहास प्रेमींना पहावयास मिळत आहेत. प्रदर्शनात २०० हून अधिक दुर्मीळ छायाचित्रांचा समावेश आहे. प्रदर्शन पाहण्यास दररोज ३ हजार तर सुट्टीच्या दिवशी ६ हजारांहून अधिक लोकांनी भेट देत आहेत.

ग्रंथ प्रदर्शनात ५७ प्रकाशकांच्या एकूण ८० हून अधिक स्टॉल आहेत. ग्रंथ उत्सवात राजर्षी शाहू महाराजांवर लिहिलेल्या विविध ग्रंथांचा संग्रह होता. दरम्यान शिवाजी विद्यापीठासह विविध विद्यापीठांमध्ये राजर्षी शाहू महाराजांच्या लिहिलेल्या प्रबंधांची देखील माहिती देण्यात येत आहे. पाच लाख रुपयांच्या ग्रंथांची विक्री झाली. कापड जत्रेत हजारो लोकांनी कापड खरेदी केले. पहिल्या दिवशी पाच लाख, दुसऱ्या दिवशी दहा लाख रुपयांची उलाढाल झाली. जत्रेत २० उत्पादकांनी २८ स्टॉल लावले आहेत. यात खादी, लीनन, कॉटन, डेनिम, सॅटिन, सॅटिन कॉटन, शिफॉर, सिंथेटिक कापडांचा समावेश आहे. लोकांचा मिळालेल्या प्रतिसादामुळे कापड जत्रे मंगळवारी देखील सुरू राहणार आहे.

पुढारी

# डॉ. आप्पासाहेब पवार जयंतीनिमित्त माजी-आजी विद्यार्थ्यांचा संवाद

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठाचे प्रथम कुलगुरू डॉ. आप्पासाहेब पवार यांच्या जयंतीनिमित्त आजी व माजी विद्यार्थ्यांचा अनोखा संवाद रंगला.

डॉ. पवार व राजर्षी शाहू महाराज यांच्या प्रतिमांचे पूजन करण्यात आले. प्रमुख पाहुणे प्रा. किसनराव कुराडे यांनी विद्यार्थी भवनच्या स्थापनेपासूनचा आढावा घेतला. डॉ.जयंत कार्तिक, प्रा. नितीन नाईक, केतन गायकवाड, डॉ. प्रकाश बेळीकट्टी, संभाजी पाटील प्रा. एस. एस. वढवे यांनी मनोगत व्यक्त केले. प्राचार्य एस. जे. नाईक यांनी जुन्या आठवणींना उजाळा दिला. मुख्य अधीक्षक डॉ. एन. एल. तरवाळ यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला. यावेळी मदन कुरचाम, पौर्णिमा पवार, एकनाथ वाघमोडे, अमोल कोल्हे, अक्षय काळभोर, आरती टिबे यांच्यासह प्रा. टी. के. सरगर, जी. आय. नाईक उपस्थित होते. स्वराज पाटील याने सूत्रसंचालन केले. सहायक अधीक्षक प्रा. भादले यांनी आभार मानले.